महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या आस्थापनेवरील सहायक सचिव (गट-ब) या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती.

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग
शासन निर्णय क्रमांक: विश्वस-२०१५/प्र.क्र.५४/आस्था-२,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगूरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २ मे,२०१८.

**शासन निर्णय:**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्रमांक २१९०(२)/८९५०/पंधरा, दि.२८.०३.२०१८ अन्वये केलेल्या शिफारशीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून खालील उमेदवारांची महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या आस्थापनेवरील सहायक सचिव गट-ब (राजपत्रित) या पदावर वेतनबँड रु.९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४४००) + इतर अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीत ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून नामनिर्देशनाने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

| गुणवत्ता क्रमांक | उमेदवाराचे नाव | वर्गवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री शामकांत बारकु देवरे | इमाव (उन्नत गटात न मोडणारे) | खुल्या प्रवर्गातून नियुक्ती |

श्री.देवरे हे सध्या पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय या कार्यालयात प्रशासकीय अधिकारी, गट-ब (राजपत्रित) या पदावर कार्यरत आहेत.

१. विद्यमान ठिकाणी त्यांची वैद्यकीय तपासणी झाली असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्व साधारण शर्ती) नियम, १९८१ च्या नियम, १५ (४) नुसार या पदासाठी स्वतंत्र वैद्यकीय तपासणी करण्यात आलेली नाही.

२. विद्यमान ठिकाणी त्यांची नियुक्ती पूर्वचारित्र्य पडताळणी करण्यात आली असून सदर कार्यालयातील सेवा कालावधीमध्ये त्यांच्या नियुक्तीस बाधित होईल अशाप्रकारचे वर्तन आढळलेले नाही.

३. श्री. देवरे यांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचा परिवीक्षा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर कालावधी समर्थनीय कारणांच्या परिणामी नियुक्ती प्राधिकारी एक वर्षापर्यंत वाढवू शकतील. या किंवा सदर वाढीव परिवीक्षा कालावधीत कामाचा अपेक्षित दर्जा

त्यांनी प्राप्त न केल्यास किंवा त्यांची वर्तणूक असमाधानकारक आढळून आल्यास त्यांची सहायक सचिव या पदावरील सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यास ते पात्र असतील.

४. त्यांची सेवाज्येष्ठता विहित नियमातील वेळोवेळी सुधारित तरतुदीनुसार व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणवत्ता क्रमांकानुसार राहील.

५. श्री. देवरे यांनी त्यांच्या विद्यमान पदावरुन विहित पद्धतीने कार्यमुक्त/सेवामुक्त होऊन महाराष्ट्र राज्य मराठी विश्‍कोश निर्मिती मंडळातील त्यांच्या नियुक्तीच्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसात रुजू व्हावे. या मुदतीत ते नियुक्तीच्या पदावर रुजू झाले नाहीत तर ते सदर नियुक्ती स्विकारण्यास इच्छुक नाहीत असे समजून त्यांचे नियुक्तीचे आदेश कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

६. विहित कालावधीत काही अपरिहार्य, समर्थनीय कारणास्तव त्यांना रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास त्यांनी शासनाकडून मुदतवाढ घेणे आवश्यक असून, तशी मुदतवाढ न घेतल्यास किंवा शासनाकडून तशी मुदतवाढ न मिळाल्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गुणानुक्रमानुसार त्यांना सेवाज्येष्ठता मिळणार नाही.

७. श्री. देवरे यांना नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव शासकीय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियमानुसार शासनास त्यासंबंधीची लेखी सूचना एक महिना आगाऊ देणे किंवा त्यांना एक महिन्याचे मूळ वेतन शासनाकडे जमा करणे आवश्यक राहील.

८. श्री. देवरे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ च्या नियम ४ नुसार विहित नमुना "अ" मधील प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

९. श्री. देवरे यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ अन्वये सध्या लागू असलेली "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू ठरेल, भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. मात्र ते १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर संतत कार्यरत असतील तर त्यांना शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२ जानेवारी, २००७ मध्ये नमूद केलेल्या व त्यानंतर वेळोवेळी सुधारित झालेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव त्यांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत शासनास पाठवावा.

१०. श्री. देवरे यांच्या नियुक्तीचे सहाय्यक सचिव हे पद मंडळाच्या वाई कार्यालयात कार्यरत आहे.

११. श्री. देवरे यांनी मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा सूट मिळविणे याबाबत यापूर्वी पूर्तता केली नसेल तर राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट घेणे आवश्यक राहील.

१२. श्री. देवरे यांना शासनाने विहित केलेली संगणक अर्हता धारण केलेली आहे.

१३. श्री. देवरे यांनी शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता विहित केलेल्या वर्तणूक नियमानुसार काटेकोरपणे पालन करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

१४. श्री. देवरे यांनी स्वग्राम घोषित केले नसल्यास त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत स्वग्राम घोषित करणे आवश्यक आहे. तद्नंतर त्यांनी स्वग्राम घोषित केल्यास संपूर्ण सेवेच्या कालावधीत स्वग्रामामध्ये बदल करता येणार नाही.

१५. श्री. देवरे हे सदर पदावर रुजू झाल्यानंतर त्यांची पदस्थापना महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या वाई कार्यालयातील सहाय्यक सचिव या पदावर करण्यात येत आहे.

१६. श्री. देवरे यांनी त्यांचे जाती प्रमाणपत्र अगोदरच जात दावा पडताळून घेतला नसल्यास त्यांनी नियुक्ती स्वीकारल्यापासून ६ महिन्यांच्या आत जात पडताळणी समितीकडून तपासून घेऊन वैधता प्रमाणपत्राची प्रत नियुक्ती प्राधिका-याकडे सादर करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०१८०५०२१३१११०४६३३** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

M. P. Kudtarkar
Digitally signed by M. P. Kudtarkar
Date: 2018.05.02 15:46:44 +05'30'

(मं. प. कुडतरकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

श्री. शामकांत बारकु देवरे, मिथिला नगरी, पिंपळे सौदागर, हॉटेल स्वराज गार्डन जवळ, पिंपरी, ता. मावळ, जि. पुणे-४११ ०२७.

प्रत,

१. संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई यांना उचित . त्यांना विनंती करण्यात येते की, श्री देवरे यांना सहायक सचिव या पदावर रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करावे.

२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,

३. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,

४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)

५. सर्व अवर सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय,मुंबई
६. सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
७. सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,वाई, जि. सातारा
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. कोषागार अधिकारी, सातारा
१०.उप कोषागार अधिकारी, वाई
११.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१२.मराठी भाषा विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई,
१३.निवड नस्ती.